**<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>**

**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**दि. ११/५/२०२६**

---

**<u>पुणे महानगरपालिका –सूचना कार्यपत्रिका क्र.२ (पुरवणी)</u>**
**<u>मे २०२६</u>**

<u>सोमवार दिनांक १८ मे २०२६ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरणाऱ्या महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवण्यासाठी खाली निर्देश केलेल्या प्रस्तावाची सूचना (नोटीस) मा.सभासदांकडून आलेल्या आहेत.</u>

**<u>:– मा. सभासदांचा प्रस्ताव –:</u>**

**<u>विषय क्र.५१</u>**

मा.विशाल धनवडे यांची सूचना दि.११/३/२०२६

-----

छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण लाल महाल या वास्तूमध्ये व्यतीत झाले. थोर भाग्य असलेली ही वास्तू देशासाठी वंदनीय आहे. लाल महाल मध्ये आतील बाजूस तळमजल्यावर राजमाता जिजाऊ यांचा अर्धाकृती पुतळा बसविण्यात आला आहे. त्या पुतळ्या शेजारी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांचा अर्धकृती पुतळा बसविण्यात यावा. मागील कार्यकाळात मुख्य सभेने ठ.क्र.१४५,दि.६/१/२०१८ रोजी मान्यता आलेली होती. तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा पुतळा क्र.११६/प्र.क्र.३०८/२९ चा शासन निर्णयानुसार मार्गदर्शक तत्वे व अटी विहित करण्यात आल्या होत्या. तसेच अटीनुसार मा.जिल्हाधिकारी यांचेकडे अंतिम परवानगीसाठी प्रकरण गेले असता त्यास १ वर्षाच्या आतमधील मुख्य सभेची मान्यता हवी असल्याने मुख्य सभेकडे पुर्न: मान्यतेसाठी सादर करीत आहोत.

**<u>विषय क्र.५२</u>**

संदर्भ – मा.मंजुषा नागपुरे,महापौर व मा.गणेश बिडकर,सभागृहनेते यांची सूचना दि.१५/४/२०२६

----

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३(२९) नुसार, शहराचे सुशोभिकरण आणि सुशासनासाठी आवश्यक उपाययोजना करणे हे महानगरपालिकेचे स्वेच्छाधीन कर्तव्य आहे. पुणे शहराच्या सर्वांगीण विकासात पुणेकरांचा सक्रिय सहभाग आणि जन-संवादाची भावना म्हणजेच पुणे प्रथम असून, या माध्यमातून लोकसहभागातून शहराचे ब्रँडिंग अधिक सक्षम करणे हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. ७४ व्या घटनादुरूस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेल्या स्वायत्ततेचा आणि MRTP अधिनियम १९६६ मधील अधिकारांचा वापर करून शहराची स्वतंत्र ओळख निर्माण करणे आवश्यक आहे.

**ठरावाचे प्रमुख मुद्दे व कायदेशीर तरतुदी**

**१) संकल्पना व बोधचिन्ह मंजुरी**

पुणे प्रथम ही संकल्पना पुणे महानगरपालिकेची अधिकृत Theme म्हणून स्वीकारण्यात येत आहे. पुण्याचा सांस्कृतिक वारसा आणि आधुनिक प्रगती यांचा संगम दर्शविणाऱ्या विशेष बोधचिन्हास (Logo) ही सभा अंतिम मंजुरी प्रदान करत आहे.

**२) नोडल विभाग नियुक्ती व मुख्य जबाबदारी**

या संपूर्ण ब्रँडिंग धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी हेरिटेज विभाग यांची नोडल विभाग म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.या विभागावर खालील जबाबदाऱ्या निश्चित करण्यात येत आहे.

मसुदा व मान्यता (Docketing) या धोरणाचा सविस्तर मसुदा (Policy Draft ) तयार करून त्यावर मा.आयुक्तांची प्रशासकीय मान्यता मिळवणे.

कायदेशीर नोंदणी: भारतीय बोधचिन्ह आणि नाव अधिनियम १९५० व ट्रेडमार्क कायद्यानुसार लोगो व टॅगलाईनची बौध्दिक मालमत्ता (IPR) म्हणून नोंदणी करणे.

ब्रँड लॉन्चिंग सोहळा:पुणे प्रथम नाममुद्रेच्या (Brand) अधिकृत लॉन्चिंगसाठी भव्य सार्वजनिक कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन व प्रसिध्दी करणे.

समन्वय:महानगरपालिकेच्या इतर सर्व विभागांकडून या ब्रँडिंगची अंमलबजावणी व अनुपालन करून घेणे.

**३) वारसा स्थळांचे जतन:**

वारसा स्थळांच्या (Heritage Sites) ठिकाणी अंमलबजावणी करताना हेरिटेज विभागाची तांत्रिक मान्यता व देखरेख अनिवार्य असेल. ऐतिहासिक वास्तूंच्या मूळ सौंदर्याला बाधा न आणता पुणे प्रथम ब्रँडिंगचा दर्जा राखण्याची जबाबदारी हेरिटेज विभागाची असेल.

**४) प्रशासकीय मान्यता व अनिवार्य अट:**

यापुढे कोणत्याही नवीन प्रकल्पाचे नियोजन किंवा अंदाजपत्रक मंजूर करताना, त्यामध्ये पुणे प्रथम ब्रँडिंगचा अंतर्भाव असणे बंधनकारक राहील. ज्या प्रकल्पांच्या आराखडयात या सुधारित निकषांचा समावेश नसेल त्यांना प्रशासकीय मान्यता ( Administrative Approval ) प्रदान केली जाणार नाही.

**५) वापराची व्याप्ती (Scope of Application):**

स्थापत्य व विकासकामे: इमारती, उद्याने, उड्डाणपूल आणि प्रकल्प माहिती फलक.

प्रशासकीय कामकाज: अधिकृत पत्रके, निविदा सूचना आणि जाहिराती.

डिजिटल ब्रँडिंग: IT Act, २००० नुसार सर्व सोशल मिडीया व वेबसाईटवर वापर.

सार्वजनिक सेवा: PMPML बस सेवा, कचरा संकलन वाहने व महापालिकेची सर्व वाहने.

**ठराव मांडला जातो की:**

पुणे शहराच्या सर्वांगीण विकासाठी आणि जागतिक ओळख निर्माण करण्यासाठी पुणे प्रथम ही संकल्पना व बोधचिन्ह अधिकृतपणे स्वीकारण्यात येत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ६३(२९) मधील तरतुदींनुसार, प्रशासकीय कार्यक्षमता व शहराच्या सुशासनामध्ये एकरूपता आणण्यासाठी, अस्तित्वात असलेल्या सर्व चिन्हांकनांचे अद्ययावतीकरण करून पुणे प्रथम ही नवीन नाममुद्रा (Brand) सर्व स्तरांवर लागू करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या संपूर्ण अंमलबजावणीची कायदेशीर डॉकेटिंगची आणि लॉन्जिंग सोहळ्याची जबाबदारी हेरिटेज विभागाकडे सोपविण्यात येत आहे. मा.आयुक्तांच्या थेट नियंत्रणाखाली हे काम युध्दपातळीवर पूर्ण करून महानगरपालिकेच्या प्रत्येक धोरणात व प्रकल्पात या ब्रँडिंगचा वापर करणे सर्व विभागांना अनिवार्य राहील.

**<u>विषय क्र.५३</u>**

मा.पुजा जागडे, मा.अपूर्व खाडे व मा.डॉ.निवेदिता एकबोटे यांची सूचना दि.१५/४/२०२६

----

पुणे महानगरपालिकेच्या श्री छत्रपती संभाजी महाराज उद्यानामध्ये श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या भव्य शिल्पाकृतीचे अनावरण महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते व मा.ना.सौ.सुनेत्रा अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री,पुणे जिल्हा व मा.ना.श्री.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.१४/५/२०२६ रोजी करण्यात यावा.

**(टिप :– विषय क्र.५१ ते ५३ हे दि.५/५/२०२६ च्या पक्षनेते सभेत फेरफारासह मान्य झाले आहेत.)**

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :–११/०५/२०२६.

**योगिता भोसले**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**